## पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र | जिल्हा District: मुंबई | पोलीस ठाणे Police Station: लाप्रवि | पहिली खबर क्र. FIR No.: 04 | वर्ष Year: 2026 | दिनांक Date: 13/02/2026

2. (i) अधिनियम Act: भ. प्र. अधिनियम 1988 ... कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence: वार Day ........ तारीख पासून Date from 09/02/2026 ते 12/02/2026 वेळ Time ........ Date to ........ वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 09/02/2026 वेळ Time ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 03 तारीख Date 13/02/2026 वेळ Time 05:15

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. दक्षिणेस 11 कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ........ ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........
रूम नं २०९, २रा माळा, अन्न व औषध प्रशासन यांचे कार्यालय
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: श्री. गंगाप्रसाद मारोतीराव मुंडिराज
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: मारोतीराव मुंडिराज
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 45 वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय फोन नं. Phone No.: 9663527227
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........
(f) व्यवसाय Occupation ........
(g) धर्म Religion: हिंदू ........ जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address ........ गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........
1305/ नोबेल हाईटस, त्रिवेणी नगर, मालाड (पूर्व), मुंबई.
रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर घेण्याच्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

राजू संपत ढेरिंगे, वय - 40 वर्षे, धंदा - नोकरी (लिपिक टंकलेखक)
नेमणूक - 209, 2रा माळा, अन्न व औषध प्रशासन यांचे कार्यालय, मंत्रालय
मुंबई - 400032



Scanned with OKEN Scanner

प्रथम खबर

तक्रारदार श्री गंगाप्रसाद मरोतीराव मुंडिराज, वय-45 वर्षे, धंदा-नोकरी, (सहा पोलीस आयुक्त), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचा स्वतंत्र कागदावर टंकलिखित केलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे.

समक्ष

(प्रविण नावडकर)
सहा पोलीस आयुक्त
लाप्रवि, मुंबई.

गंगाप्रसाद मुंडिराज
सहा पोलीस आयुक्त
लाप्रवि, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

खबर दि. १३/०२/२०२६

श्री. गंगाप्रसाद मारोतीराव मुदीराज, ४५ वर्षे, धंदा नोकरी (सहाय्यक पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई) रा.ठि. १३०५/नोबल हाईट्स, त्रिवेणी नगर, मालाड (पुर्व) मुंबई मो.क्र. ९५६३५७७७७७.

...OOO...

मी वरील प्रमाणे असून वर नमूद ठिकाणी माझे कुटुंबासह रहावयास आहे. मी दि. १५/०९/२०२५ रोजीपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर नेमणूकीस आहे.

मी दि. ०९/०२/२०२६ रोजी कर्तव्यावर असताना मला माझे वरिष्ठांनी समक्ष बोलावून एक तक्रारदार असून त्यांचेकडे एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असलेबाबतची तक्रार प्राप्त झाली असल्याचे सांगून त्यावर कारवाई करणेकरीता माझी व सपोआ मानसिंग आनंदराव पाटील यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली.

त्यानुसार मी व सपोआ पाटील असे तक्रारदार श्री. हरिराम रूपारामजी घांची यांची लाप्रवि, मुंबई कार्यालयात भेट घेवून त्यांचेकडे तक्रारीबाबत विचारणा केली असता, त्यांनी तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगून पुढीलप्रमाणे लेखी तक्रार अर्ज हिंदीत समक्ष लिहून दिला. तक्रारदार यांचा मुनलाईट मेडिकल आणि जनरल स्टोअर्स नावाचे, पत्ता:- शॉप नंबर ०४, मुजावर चाळ, एस.एम.डी रोड, शेख मिस्त्री दर्गाजवळ, अॅन्टॉपहिल, मुंबई येथे दुकान आहे. सदर दुकानावर दिनांक १०.१०.२०२५ रोजी फुड अॅड ड्रग अॅडमिनिस्ट्रेशन चे अधिकारी ड्रग इन्सपेक्टर, श्री. हेमंत रा.आडे, झोन-०२ हे तक्रारदार यांच्या दुकानाच्या तपासणीकरीता येवून सदर दुकानातील औषधाची तपासणी करून निघुन गेले. त्यानंतर दिनांक १५.१०.२०२५ रोजी फुड अॅड ड्रग अॅडमिनिस्ट्रेशन चे अधिकारी श्री. सह आयुक्त डॉ. प्र.दि.हारक यांनी तक्रारदार यांना कारणे दाखवा नोटीस तक्रारदार यांच्या दुकानात पाठवली. त्यानंतर तक्रारदार यांची दिनांक २९.१०.२०२५ रोजी सह आयुक्त यांचे कार्यालयात सुनावणी होवून त्यांनी कार्यालयात त्याबाबत लेखी जबाब सादर केला. त्यानंतर दिनांक ३०.१०.२०२५ रोजी सदर कार्यालयाने तक्रारदार यांना त्यांच्या दुकान परवान्याचे १२ दिवसाकरीता निलंबन केल्याचा आदेश दिला होता.

त्यानंतर दिनांक २३.०१.२०२६ रोजी तक्रारदार यांनी त्यांना दिलेल्या दुकानाच्या १२ दिवसाच्या परवाना निलंबन आदेशा विरुध्द् मा.मंत्री महोदय, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे अपील करून रितसर रिसीव्ह कॉपी घेतली. त्यावेळी सदर कार्यालयातील रिसीव्ह कॉपी देणारे लिपीक यांनी तक्रारदार यांना राजू संपत ढेरिंगे यांचा मोबाईल नंबर देवून त्यांना फोन करण्यास सांगितले त्यावरून तक्रारदार यांनी राजू संपत ढेरिंगे यांना फोन केला. त्यावेळी राजू संपत ढेरिंगे यांनी तक्रारदार यांना त्यांच्या दुकानाच्या परवाना निलंबन आदेशाची व अपीलाची कॉपी त्यांच्या वाट्सअप पाठविण्यास सांगितले. त्यावरुन तक्रारदार यांनी त्यांची दुकानची निलंबन आदेश व अपीलाची कॉपी राजू संपत ढेरिंगे यांच्या वाट्सअप नंबरवर पाठविले. त्यानंतर तक्रारदार यांनी राजू संपत ढेरिंगे यांना दिनांक २७.०१.२०२६ रोजी त्यांच्या मोबाईलवर फोन करून त्यांच्या प्रलंबित कामा बाबत कार्यालयात भेटण्यास येण्याबाबत विचारले असता श्री. ढेरिंगे यांनी दिनांक २८.०१.२०२६ रोजी तक्रारदार यांना कार्यालयात भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे तक्रारदार दिनांक २८.०१.२०२६ रोजी श्री.घांची व त्याचे साथीदार श्री. शंकरलाल भुरारामजी चुलीयारा असे दोघे श्री. ढेरिंगे यांना त्यांच्या प्रलंबित कामा संदर्भात भेटण्यास गेले. त्यावेळी लोकसेवक श्री.ढेरिंगे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या प्रलंबित काम पुर्ण करण्याकरीता तोंडी रू. ५०,०००/- इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक ढेरिंगे यांना लाचेची रक्कम कमी करण्याकरीता विनंती केली. त्यावर लोकसेवक श्री.ढेरिंगे यांनी नकार देत त्यांनी तक्रारदार यांना त्या कार्यालयातील त्यांचे वरिष्ठ श्री. रामदास गाडे, पद-खाजगी सचिव यांना भेटण्यास सांगून त्यांच्या कक्षेत घेवून गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक गाडे यांना त्यांच्या प्रलंबित कामा संदर्भात हकिकत सांगितली. त्यावर लोकसेवक श्री.गाडे यांनी तक्रारदार यांच्याकडे तोंडी रू. ५०,०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली.

परंतू तक्रारदार यांना लोकसेवक श्री.ढेरिंगे व लोकसेवक श्री. रामदास गाडे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दि. ०९/०२/२०२६ रोजी लाप्रवि, मुंबई कार्यालयास समक्ष येवून लोकसेवक ढेरिंगे व लोकसेवक श्री. गाडे यांचेविरोधात लाच मागणीची वरीलप्रमाणे लेखी तक्रार दिली.

Scanned with OKEN Scanner

सदर तक्रारीची दि. ०९/०२/२०२६ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे तक्रारदार श्री.घांची यांना सांगितले. त्याकरीता मी दोन शासकीय पंच व पोलीस पथक यांना पाचारण केले व त्यांचेशी तक्रारदार यांची ओळख करून दिली. तक्रारदार यांनी केलेला अर्ज नमूद पंचाना वाचावयास देवून त्यावर मी, पर्यवेक्षण अधिकारी व पंच यांनी स्वाक्षरी केली. त्यांनतर मी तक्रारदार यांना लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी मला त्यांचेकडे रू. ५०,०००/- नसल्याचे सांगून, ते तजवीज करतील असे सांगितले.

तक्रार अर्जात नमूद केलेल्या तक्रारीवर दि. ०९/०२/२०२६ रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणीकरीता शासकीय वाहनातून तक्रारदार, पंच, अधिकारी, पथक व उर्वरीत पथक असे आम्ही पडताळणी कारवाईकरीता मंत्रालय, मुंबई या ठिकाणी पोहचलो. त्यानंतर पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मंत्रालयामध्ये प्रवेश करण्याकरीता आवश्यक असलेली डिजी प्रवेश प्रक्रिया पुर्ण करून त्युनसार पास घेवून मंत्रालय गेटच्या आत मध्ये प्रवेश केला. त्यानंतर आम्ही आमच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर पोह/गायकवाड यांच्या मदतीने चालु करून तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर तक्रारदार व पंच साठे लोकसेवक ढेरिंग यांच्या कार्यालयाकडे पायी रवाना झाले. व थोडयावेळानंतर पुन्हा शासकिय वाहना जवळ आले. त्यानंतर आम्ही पंचांसमक्ष तक्रारदार यांना लोकसेवकासोबत काय संभाषण झाले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांचे व लोकसेवक राजू ढिरिंगे यांचेमध्ये बोलणे झाले व त्यांनी तक्रारदार यांना **''तुम्हाला काय मॅसेज दिला होता.'' '' पन्नास सांगितले होते आपल्याकडे.'' असे बोलले.** यावर तक्रारदार यांनी सदर रक्कम जास्त असल्याचे सांगून बोलणे केले असता त्यांनी तक्रारदार यांना जोपर्यंत मिनीस्टर सरांच्या सहया होत नाहीत तोपर्यंत दुकान बंद ठेवावे लागेल असे सांगून मिनिस्टर सर नसल्याने ''आज नाही उदया सकाळी, उदया सकाळी अकरा वाजेला त्यांना फोन करायचा, मिनिस्टर राहिले दोन वाजेला येयाचं.'' असे सांगितले. लोकसेवक ढेरिंगे व तक्रारदार श्री. घांची यांच्यात पडताळणी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये लोकसेवक राजू ढिरिंगे यांनी तक्रारदार श्री. घांची यांचेकडे रू. ५०,०००/- लाचेच्या संदर्भात चर्चा करून मागणी केल्याचे स्पष्ट झाले. परंतू लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दिनांक १०.०२.२०२६ रोजी फोन करून येण्यास सांगितले होते त्यानुसार आम्ही तक्रारदार श्री.घांची ,सापळा पथक तसेच दोन पंचांना दिनांक १०.०२.२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत सांगितले.

आम्ही सांगितल्याप्रमाणे दिनांक १०.०२.२०२६ रोजी तक्रारदार श्री.घांची हे लाप्रवि कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी दोन्ही पंच आमचे कार्यालयात हजर होते. आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचाना पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षेत घेवून गेलो. त्यावेळी आम्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना सांगितले की, दिनांक ०९.०२.२०२६ रोजी लोकसेवक ढेरिंगे यांनी सांगितल्याप्रमाणे तक्रारदार श्री. घांची हे त्यांचा मोबाईल क्रमांक ९४६०५५५५८८ या नंबर लोकसेवक ढेरिंगे यांचा मोबाईल क्रमांक ९५११२२०१६० वर मोबाईल फोन करतील व त्यांच्यात होणारे मोबाईल संभाषण व्हॉईस रेकॉर्डर मधील एस.डि.कार्ड मध्ये ध्वनिमुद्रित करण्यात येईल. आम्ही दिलेल्या आदेशाप्रमाणे तक्रारदार श्री. घांची यांनी त्यांचा मोबाईल फोनचा स्पिकर चालु करून लोकसेवक ढेरिंगे यांच्या मोबाईलवर फोन केला. सदरवेळी लोकसेवक ढेरिंगे हे **त्यांच्या कार्यालयात उपस्थित असून कार्यालयात भेटायला दुपारी ०२.०० वाजेनंतर या असे सांगितले होते.** परंतु तक्रारदार श्री.घांची यांची प्रकृती अचानक बिघडल्याने दिनांक १०.०२.२०२६ रोजी आम्ही लोकसेवक यांच्या कार्यालयात भेटण्यास गेलो नाही. सदरचे मोबाईल फोन चे संभाषण आम्ही पो.ह. गायकवाड यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.घांची, शासकिय पंच, सापळा पथकातील अंमलदार यांना दिनांक ११.०२.२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत सांगितले होते.

त्यानुसार दिनांक ११.०२.२०२६ रोजी आम्ही सांगितले प्रमाणे तक्रारदार श्री. घांची, शासकिय पंच, व सापळा पथकातील अंमलदार असे लाप्रवि कार्यालयात हजर झाले. त्यानंतर आम्ही, पर्यवेक्षण अधिकारी, सापळा पथकातील अंमलदार, शासकिय पंच व तक्रारदार श्री.घांची असे शासकिय वाहनाने मंत्रालयाच्या दिशेने रवाना झालो. सदर ठिकाणी शासकिय वाहने पार्किंग केल्यानंतर आम्ही, पर्यवेक्षण अधिकारी, सापळा पथकातील अंमलदार व शासकिय पंच असे मंत्रालयामध्ये प्रवेश करण्याकरीता आवश्यक असलेली डिजी प्रवेश प्रक्रिया पुर्ण करून त्युनसार पास घेवून मंत्रालय गेटच्या आत मध्ये प्रवेश केला. त्यानंतर आम्ही आमच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर पो.ह. गायकवाड यांच्या मदतीने चालु करून तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर तक्रारदार व पंच साठे लोकसेवक ढेरिंग यांच्या कार्यालयाकडे पायी रवाना झाले. व थोडयावेळानंतर पुन्हा शासकिय वाहना जवळ आले. त्यानंतर आम्ही पंचांसमक्ष तक्रारदार यांना लोकसेवकासोबत काय संभाषण झाले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांचे व लोकसेवक

Scanned with OKEN Scanner

राजू ढेरिंगे यांचेमध्ये बोलणे झाले व त्यांनी तक्रारदार " कसं करायचं सांग!" " तेच तर बोलो तुम्हाला, ते, ते, ते जे पाठीमागे बोलो ते! सरजे बोललं ते, तुम्हाला तसाचं मॅसेज त्यांनी केला होता." " फाईनल किती करू शकता तुम्ही त्याला ? " " तुम्ही एका नंबर दिला त्याच्यावर टाकुन दया." " हा, महणजे मी इथुन विथड्रा करून!" असे बोलले. त्यानंतर " जा तुम्ही घरी जा! सकाळी फक्त मला फोन करा. दोनच्या नंतरच ये असे बोलणे झाले. त्यानंतर पर्यवेक्षण अधिकारी यांनी लोकसेवक ढेरिंगे यांनी तक्रारदार यांना दिनांक १२.०२.२०२६ रोजी दुपारी ०२.००. वा. त्यांना त्यांच्या कार्यालयात भेटण्यास बोलावले असल्याने आम्ही सापळा पथकातील अंमलदार, शासकिय पंच, तक्रारदार श्री.घांची यांना दिनांक १२.०२.२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे दिनांक १२.०२.२०२६ रोजी पर्यवेक्षण अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. घांची, शासकिय पंच, सापळा पथकातील अंमलदार आमच्या कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांना कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षेत घेवून गेलो. त्यानंतर आम्ही त्या दोन पंचासमक्ष तक्रारदार श्री.घांची यांना त्यांच्या मोबाईल फोनवरून लोकसेवक ढेरिंगे यांच्या मोबाईलवर फोन करण्याच्या सुचना देवून फोन कॉल पो.ह. गायकवाड यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डर मधील एस.डि.कार्डमध्ये ध्वनिमुद्रित केला जाईल असे सांगितले. आम्ही तक्रारदार यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर ऑन करून लोकसेवक ढेरिंगे यांच्या मोबाईलवर फोन कॉल केला, त्यावेळी सदरचा फोन लागला परंतु व्यवस्थित ऐकू येत नसल्याने फोन आपोआप कट झाला. सदरचा फोन व्हॉईस रेकॉर्डमधील एस.डि कार्ड मध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आला. दिनांक ११.०२.२०२६ रोजी लोकसेवक ढेरिंगे यांनी भेटण्यास बोलावल्यावरून पर्यवेक्षण अधिकारी श्री.पाटील, आम्ही, शासकिय पंच, सापळा पथकातील अंमलदार असे मंत्रालयाच्या दिशेने दोन शासकिय वाहनाने रवाना झालो. सदर ठिकाणी शासकिय वाहने पार्किंग केल्यानंतर आम्ही, पर्यवेक्षण अधिकारी, सापळा पथकातील अंमलदार व शासकिय पंच असे मंत्रालयामध्ये प्रवेश करण्याकरीता आवश्यक डिजी प्रवेश प्रक्रिया पुर्ण करून त्युनसार पास घेवून मंत्रालय गेटच्या आत मध्ये प्रवेश केला.

त्यानंतर मी पंचासह सर्व पथकास सापळापुर्व/सापळा कारवाईचे आयोजन करीत असल्याचे सांगून त्याकरीताच्या आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितली असता त्यांनी त्यांचेकडील भारतीय चलनातील रू. ५००/- दराच्या एकूण ७०/- नोटा असे एकूण रू. ३५,०००/- हजर केले.

त्यानंतर सपोआ पाटील यांचे सुचनेवरून पोहचा/चव्हाण यांनी तक्रारदार श्री. घांची हे लोकसेवक ढेरिंगे यांना लाच म्हणून देण्यात येणाऱ्या एकूण रू. ३५,०००/- (अक्षरी पस्तीस हजार रूपये फक्त) लाचेच्या रक्कमेला व सदर रक्कम ठेवलेल्या खाकी रंगाच्या कागदी पाकिटाला अॅन्थ्रासिन पावडर लावून सदर खाकी रंगाचे कागदी पाकिट पोहचा/चव्हाण यांनी तक्रारदार यांचे आकाशी रंगाच्या जिन्स पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली.

त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोह गायकवाड यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर तक्रारदार व पंच श्री. साठे असे तक्रारदार लोकसेवक ढेरिंगे अन्न व औषध प्रशासन, रूम नंबर २०१, मुख्य इमारत, दुसरा मजला या कार्यालयाच्या दिशेने पायी रवाना झाले. त्यांचे मागोमाग पोलीस पथक व पंच क्र. ०१ पवार असे पायी रवाना झाले. तक्रारदार हे लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या बाहेर पोहोचले. त्याचबरोबर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार हे देखील तक्रारदार यांचे जवळ पास कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबले. त्यानंतर तक्रारदार श्री.घांची व पंच साठे लोकसेवक ढेरिंगे यांच्या कार्यालयात गेले. सदर ठिकाणी गेल्यावर लोकसेवक ढेरिंगे यांनी तक्रारदार घांची व पंच साठे यांना थोडयावेळ बसवून ठेवले. सदर भेटी दरम्यान तक्रारदार श्री.घांची व लोकसेवक ढेरिंगे यांच्यामध्ये संभाषण झाले त्यातील ठळक संभाषण पुढीलप्रमाणे. **लोकसेवक ढेरिंगे-सुनो! अभी कैसा करेंगे बोलो?, तक्रारदार श्री. घांची-आप बतावना सर जैसा आप बोलेंगें , लोकसेवक ढेरिंगे- चालीस देके खत्म करो., तक्रारदार श्री. घांची-कितना?, लोकसेवक ढेरिंगे- चालीस, लोकसेवक ढेरिंगे- क्या है ना, मै अपने उपर बहोत ज्यादा नही ले सकता है। एक दस का बात उतने तक है, अपना कॅपेसिटी, नही तो फिर क्या होगा ? मेरी बात सुनो, क्या होगा ? कल फ्रायडे है, कल भी साहब आऐंगे नही। सॅटरडे, संन्डे जाऐगा। मन्डे को आऐगें आप ? अगर रूक सकते हो तो, वापिस आप कम करेंगे। लेकिन ? लोकसेवक ढेरिंगे- फिर देखो आप, अभी अपने तरफसे क्या है, वो मिनिमम है। बेसिक अपने तरफ मतलब मै वो पुरा। क्या है मेरे हाथ मे उतना रहा, मै इतना आपको बोलने नही देता कल वो कभी फाईल कर देता। मगर मै सोचा अभी साहब से बात करू ! तक्रारदार श्री.**

Scanned with OKEN Scanner

घांची-साहब से बात करके देखो गाडे साहब से ।, लोकसेवक ढेरिंगे-वो लेही नही रहें दिल्ली मे है। फोन बंद करके बैठे है। मैने वो भी ट्राय किया दो तीन बार ट्राय किया। सर से बात करो, वो हो नही रहा। क्या करते फिर, या फिर मन्डे को आते है।, तक्रारदार श्री. घांची-पाच बिच कम करके करो यार।, लोकसेवक ढेरिंगे-अभी जो मेरा कॅपेसिटी है ना वो वहातक मै कर सकता हु। उसके निचे मै नही कर सकता हु। अररे ! आपन, मै अपने तर मै अपनी जिमेदारी पर कर रहा ह। आप समज नही रहे है। यहा अभी इधर कैसा रहता है, के बोल यार ये खा गया पैसा, कुछ भी उंगली उठाता है। इधर जो है ना, स्टेबल नही है। अपने उपर है, फिर आपको दिख रहा होगा अलग, लेकिन इधर कैसा है। बहोत जिमेंदारी का काम है। उनके पास से साईन लेने को तो, पुछता वो, हर चिज पुछता है। तक्रारदार श्री. घांची-आपका भी नही, मेरा भी नही. मैनै, मेरे पास अभी पैतिस हजार है इससे ज्यादा नही है। पैतिस लेके आया हु मै।, तक्रारदार श्री. घांची- मै कल तीस बोलके गया आपको, तीस तक हो पाऐगा करके। लेकिन मै पैतिस लेके आया हु। इससें ज्यादा नही है मेरे पास अब।, लोकसेवक ढेरिंगे-कल ही मैन बोला था , चालीस वो करेंगे। मतलब मेरे हाथ मे रहताना सर, सचमें मै इतना इतना नही बोलुंगा। वो मेरेको ही गलत लग रहा है के, मतलब कोई जेन्युईन पर्सन है ना उसकेलिए आपन, लेकिन अपने हाथमें नही तो आपन करें। आपका केस मानों ज्युन्युन है, लेकीन उसमें कैसा है। अपना भी तो रिस्ट्रक्शन आ जाता है के आपन किस्से।, तक्रारदार श्री. घांची- वो अपनी तरफसें करते ना, दिक्कत नही आता है, वो टाईम मै बोल भी सकता हु, साहब ऐसा रह गया, ऐसा है। वो सामने से होता है ना, तो दिक्कत नही आता है। और आप ऐसा ना पिछेना वो कैसा है, डाउट फुल देखता है अपनी तरफ, के आपन ऐसा के इसने तो नही निकाल लिया ऐसा बात रहता है।, तक्रारदार श्री. घांची-''पैतिस हजार मेरेपास है, मै लाया हु, इतना दे सकता हु ''।, लोकसेवक ढेरिंगे- किधर है।, तक्रारदार श्री.घांजी-जेब में हि है। जेब मे है।, तक्रारदार श्री.घांजी- अभी दु।, तक्रारदार श्री.घांजी- पॅकेट में है ना।, हा, लोकसेवक ढेरिंगे ओपन है, थर्टी फाईव्ह इसमें ना। थर्टी फाईव्ह ना। असे बोलत लोकसेवक ढेरिंगे यांनी तक्रारदार श्री.घांची यांच्याकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यावर तक्रारदार श्री.घांची यांनी त्यांच्या आकाशी रंगाच्या जिन्स पॅन्टमध्ये ठेवलेली लाचेच्या रक्कमेची खाकी पाकिट बाहेर काढून गृहविभाग कार्यालयातील अन्न व औषध प्रशासन कार्यालयात जाण्याच्या चिंचोळया पॅसेजमध्ये लोकसेवक ढेरिंगे यांच्या हातात लाचेची रक्कम खाकी पाकिटासह बाहेर काढून दिली. त्यानंतर सदरची लाचेची रक्कम घेवून लोकसेवक ढेरिंगे ते बसलेल्या टेबलवर जूावन बसले. त्यानंतर तक्रारदार यांनी मला हाताचा अंगठा दाखवून लोकसेवक ढेरिंगे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा करताच मी दुसऱ्या मजल्यावरील आसपास दबा धरून बसलेले इतर सापळा पथकातील अंमलदार व अधिकारी यांना इशारा केला. त्यानंतर सापळा पथकातील पोलीस अधिकारी वं अमलदार यांनी सदर इसमास लाचेच्या रकमेसह अंदाजे १८.०६ वा. चे सुमारास ताब्यात घेतले.त्यानंतर मी ,पोह/गायकवाड यांच्या मदतीने तक्रारदार श्री.घांची यांच्या शर्टच्या आतील लावलेला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यानी त्याचे नाव राजू संपत ढेरिंगे, ४० वर्षे, धंदा- नोकरी लिपीक, रूम नंबर २०१, मंत्री अन्न व औषध प्रशासन यांचे कार्यालय, दुसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई रा.ठि. बी/०६, हापकिंग इन्सटीटयुट, परेल, मुंबई, कायमचा पत्ता:-प्लॉट नंबर ०१, पहिला मजला, आनंद मॉल अपार्टमेंट,कोठारी गर्ल स्कुल, जेल रोड, नाशिक रोड, नाशिक असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पर्यवेक्षन अधिकारी पाटील यांनी दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक ढेरिंगे यांना त्यांनी तक्रारदार यांचेशी संभाषणादरम्याने ''सरांशी बोलून सांगतो'' तसेच ''सरांचेकडून अप्रुवल करून घेतो ''तसेच ''सर असते तर त्यांचे समक्ष बसवून बोलणे करून दिले असते'' यासह वरील संभाषणात तक्रारदार यांचेशी जे बोलत होतात ते कोणाबददल ? असे विचारले असता तेव्हा लोकसेवक ढेरिंगे यांनी त्यांचे कार्यालयीन वरिष्ठ खाजगी सचिव डॉ.रामदास गाडे यांचे नाव घेतले तेव्हा ते कोठे आहेत या बाबत विचारणा केली असता ते मिटींग करीता बाहेर दिल्ली येथे गेले आहेत असे सांगितले.मात्र तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीत राजू ढेरिंगे यांचे कार्यालयीन वरिष्ठ खाजगी सचिव डॉ.गाडे यांचे नाव देखील नमूद केले असल्याने नमूद घटनेचे अनुषंगाने खाजगी सचीव डॉ. रामदास गाडे यांचा नक्की रोल काय आहे तसेच ते नक्की कोठे आहेत याची पडताळणी करणे आवश्यक असल्याने ताब्यातील लोकसेवक ढेरिंगे यांस त्याचा मोबाईल क्रमांक ९५११२२०१६० वरून स्पिकर ऑन करून लोकसेवक खाजगी सचिव डॉ.गाडे यांचा मोबाईल क्रमांक ९४०३७२५५०९ वर फोन करण्यासाठी व पो.ह.गायकवाड यांना व्हॉईस रेकॉर्ड मधील एस. डि.कार्ड मध्ये सदरचे संभाषण ध्वनिमुद्रित करण्याच्या सुचना दिल्या. लोकसेवक ढेरिंगे यांनी लोकसेवक खाजगी सचिव डॉ.गाडे यांना त्यांच्या मोबाईलचा स्पिकर ऑन करून फोन केला व सदरचे संभाषण पोह/गायकवाड यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ध्वनिमुद्रित केले.परंतु सदरचा फोन नेटवर्क क्षेत्राचे बाहेर असल्याचे निदर्शनास आले.

Scanned with OKEN Scanner

तरी दि. ०९/०२/२०२६ रोजी तक्रारदार श्री. हरिराम रूपारामजी घांची यांनी लाप्रवि, मुंबई येथे लोकसेवक राजू संपत ढेरिंगे, ४० वर्षे, धंदा- नोकरी लिपीक, रुम नंबर २०१, मंत्री अन्न व औषध प्रशासन यांचे कार्यालय, दुसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई रा.ठि. बी/०६, हापकिंन इन्सटीटयुट, परेल, मुंबई, कायमचा पत्ता:-प्लॉट नंबर ०१, पहिला मजला, आनंद मॉल अपार्टमेंट, कोठारी गर्ल स्कुल, जेल रोड, नाशिक रोड, नाशिक याने त्याचे कार्यालयीन वरिष्ठ श्री.डॉ.रामदास गाडे, पद-खाजगी सचिव, रूम नंबर २०१, मंत्री अन्न व औषध प्रशासन यांचे मार्फतीने तक्रारदार श्री.हरिराम रूपारामजी घांची यांचे मुनलाईट मेडिकल आणि जनरल स्टोर्स, या नावाच्या मेडिकलचा १२ दिवसा करीता निलंबीत केलेला परवाना आदेशाला स्थगिती मिळवून देणेकरीता मदत करणेसाठी तक्रारदार यांचेकडे दिनांक ०९.०२.२०२६ रोजी रू. ५०,०००/- रकमेच्या लाचेची मागणी केली व आज दि. १२/०२/२०२६ रोजी तडजोडीअंती रू. ३५,०००/- स्विकारताना त्यांना रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. म्हणून माझी वरील लोकसेवक राजू संपत ढेरिंगे वय ४० लिपीक यांचे विरुध्द सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

माझी वरील खबर मी स्वत: संगणकावर मराठित टंकलिखीत केलेली असून ती बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(प्रविण नावडकर)
स.पो.आ.
ला.प्र.वि., मुंबई

हा लिहून दिला,

(गंगाप्रसाद मुदिराज)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ... नाही

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ... रु 35,000/- (भारतीय चलनातील रु 500/- दराच्या 70 नोटा)

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आलोसे शंभु ढेरिंगे यांनी तक्रारदार यांच्या मुनलाईट मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, अॅन्टॉप हिल यास देण्यात आलेला परवाना निलंबन आदेशास तक्रारदार यांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालय, मंत्रालय येथे दाखल केलेले अपिल स्वजाती अन्वित गोडे यांचे मार्फतीने लोकसेवक शंभु ढेरिंगे यांनी स्वतःच्या फायद्याकरीता रु 50,000/- लाचेची मागणी करून, तडजोडी अंती रु 35,000/- लाचेची रक्कम स्विकारल्याचे मान्य करून त्यांना रक्कम स्विकारताना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ...

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ...

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ... जिल्हा ... राज्य ...

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ... Rank ... No. ... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...

(3) Transferred to P. S. ...
District ... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ... प्रविण जावडकर

पदनाम Rank ... सहा. पोलीस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्र. ... लाचलुचपत प्रतिबंधक
Posting विभाग, मुंबई.

Code No. of I. O. ...

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ... दि: 13/02/2026
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत<br>Copy to | 2. फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner